

व्ही. टी. पाटील यांचा कोल्हापुरात बुधवारी माजी मंत्री यशवंतराव मोहिते यांच्याहस्ते मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. (छाया : अनिल वेल्हाळ)

# क्रियाशील असलं तरच आयुष्य हवंय : व्ही. टी.

कोल्हापूर, : "आणखी काही वर्ष आयुष्य मिळाले तर मला हवं आहे, पण अपूर्ण राहिलेले ताराराणी महिला विद्यापीठाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तडफेने काम करता येईल, असे क्रियाशील आयुष्य असेल तरच ते मला हवं आहे!" असे भावनोत्कट उद्गार शिक्षणमहर्षी व्ही. टी. पाटील यांनी बुधवारी नवती महोत्सव नागरी सत्कार समितीच्यावतीने झालेल्या सत्काराला उत्तर देताना काढले.

नवती महोत्सव नागरी सत्कार समितीच्यावतीने काल शिक्षण[illegible] टी. पाटील यांचा काल ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात ९० व्या वर्षात पदार्पण केल्याच्यानिमित्ताने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार व जेष्ठ विचारवंत यशवंतराव मोहीते होते. सत्कार समारंभास उद्योगपती बा. म. गोगटे, खासदार बाळासाहेब माने, ज्येष्ठ नाटककार प्रा. वसंत कानेटकर, शिक्षणमहर्षी प्राचार्य एम. आर. देसाई, शेठ मदनमोहन लोहीया आदी मान्यवरांचीहि उपस्थिति होती.

'नव्या पिढीला स्वतःचे मार्ग चोखाळता यावेत यासाठी स्वतःचे जीवन शिक्षणक्षेत्रात झोकून देणारी पिढी शिक्षणक्षेत्रात सतत काम करीत राहण्याची गरज आहे" असे प्रतिपादन श्री. मोहीते यांनी अध्यक्षीय भाषणात केले. आज मानवजातीला तलवार हाती घेऊन दुसऱ्याच्या अंगावर वार करण्यासाठी धावणाऱ्यांची नव्हे तर युद्धाशिवाय जग निर्माण करण्याची चिंता करणाऱ्यांची आणी मानवतेचे पोषण करून मानवीमूल्ये जोपासणाऱ्यांची गरज असल्याचेहि श्री. मोहीते यांनी सांगितले.

माओच्या शिक्षणविषयक विचारांची अंमलबजावणी आपल्याकडे झाली तर शैक्षणीक क्रांती घडू शकेल, असा विश्वास व्यक्त करून श्री. मोहीते यांनी शिक्षणाचा दृष्टीकोन बदलण्याची गरज असल्याचे सांगितले. आपल्या देशातील मातीवर प्रेम करायला शिकविते ते खरे गुणवत्तापूर्ण शिक्षण असे प्रतीपादन करून श्री. मोहीते म्हणाले की, उच्चतर शिक्षण देण्याची सोय भारतात हवी, पण हे शिक्षण घेतल्यानंतर उच्चतर शिक्षण घेणाऱ्यांनी या देशात राहावे यासाठी आवश्यक तर कायदेशीर तरतूद केली पाहीजे.

(पान ८ पहा)

(पान १ वरून)

महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ किंवा शिक्षणसंस्थानी मागणी करायची असेल तर समाजात कोणती भूमिका घडविणारी स्त्री आपल्याला घडवायची आहे हे आपल्यासमोर स्पष्ट असायला हवे आणि त्यासाठी आवश्यक तर प्राथमिक शिक्षण किंवा आरोग्य सेवा यासारखी ज्या क्षेत्रात महिला अधिक चांगले काम करू शकतात, अशी क्षेत्रे महिलांसाठी राखून ठेवण्याची भूमिका मांडावी लागेल असेही श्री. मोहीते यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सत्कार समिति अध्यक्ष माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांनी प्रास्ताविक केले. तर शेठ मदनमोहन लोहीया, मनोहर पंडीत, उद्योगपती बा. म. गोगटे यांनी श्री. पाटील यांचा गौरव करणारी भाषणे झाली. शिवाजीराव मोरे व श्रीमती सुशिलाताई पाटील यांनी ताराराणी महिला विद्यापीठ व महिलांसाठी सैनिकी स्कूलच्या विद्यापीठ व महिलांसाठी सैनिकी स्कूलच्या मागणीचा आपल्या भाषणांत पुनरूच्चार केला. प्रा. अंबादास माडगूळकर यांनी मानपत्राचे वाचन केले.

केसरी

गुरुवार दि. १८ जानेवारी १९९०

(73)